पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे ३८

## राज्यशास्त्र विभाग

### वार्षिक अहवाल २०२२-२३

राज्यशास्त्र विभागाकडून २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात पुढील कार्यक्रम आणि उपक्रम घेण्यात आले होते त्याचा अहवाल.

**१. राष्ट्रीय मतदार दिन :-**

दि.२५ जानेवारी २०२३ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय व पुणे महानगरपालिकेच्या निवडणूक विभाग तसेच राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग राज्य निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र, जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे आणि कोथरूड विधानसभा निवडणूक अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचीत्य साधून लोकसहभागाला महत्व देत घोषवाक्य, वकृत्व, निबंध, चित्रकला, रांगोळी, लघुपट, मिम्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.पी. सातव, उपायुक्त तथा मतदान नोंदणी अधिकारी डॉ. महेश डोईफोडे, सहाय्यक मतदान अधिकारी तथा तहसीलदार बालाजी शेवाळे, नायब तहसीलदार स्वप्नील खोल्लम उपस्थित होते.

**२. संविधान दिन :-**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दि २६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.पी. सातव, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी सर्वांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

**३. मानवी हक्क दिन:-**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नेहरू युवा केंद्र संघटन पुणे(युवक व क्रीडा मंत्रालय भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. यशवंत मानखेडकर (उप संचालक महाराष्ट्र राज्य, नेहरू युवा केंद्र संघटन)उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.पी.

सातव, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी ऑनलाईन आणि प्रत्यक्ष उपस्थित होते. मा. यशवंत मानखेडकर यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्क दिनाचे महत्व समजावून सांगितले

## ४. लोकशाही निवडणूक आणि शासन या विषयावरील व्याख्यान :-

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आणि वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही निवडणूक आणि शासन या विषयावरील व्याख्यान बुधवार दि.१९/४/२०२३ रोजी डॉ. राहुल नरंगलकर (राज्यशास्त्र विभागप्रमुख आण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. राहुल नरंगलकर यांनी राज्यघटना, लोकशाही शासनव्यवस्था आणि प्रशासन या विषयी मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.पी. सातव, प्राध्यापक, आणि विद्यार्थी उपस्थित होते.

K.V. Karanjawe

**विभागप्रमुख राज्यशास्त्र**
**मामासाहेब मोहोळ महाविद्यालय**
**पौड रोड, पुणे - ३८.**

प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे - ३८